वर्ष-०७ | अंक-१९ | मुंबई, मंगळवार ३० मार्च ते ०५ एप्रिल २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2
डमी विद्यार्थ्यांनी दिली तलाठी पदासाठी परीक्षा; बनवाबनवी अशी झाली उघड

3 → नांदेड जिल्ह्यात करोना मृतांच्या अंत्यविधीसाठी 12 तासांचे वेटिंग

व्यापाऱ्यांचा बंदविरोधात संताप ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## 'शिवनेरी'कडे प्रवाशांची पाठ



मुंबई : मुंबईसह पुण्यात करोना रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे या दोन शहरांदरम्यान धावणाऱ्या एसटीच्या शिवनेरी सेवेला फटका बसत आहे. प्रवासी या सेवेकडे पाठ फिरवू लागले असून फेब्रुवारी महिन्यात प्रतिदिन असणारी २,८०० पर्यंतची प्रवासी संख्या सध्या २,४०० पर्यंत घसरली आहे. तर उत्पन्नही ...पान २ वर...

## चौकशी अहवाल 15 दिवसांत



मुंबई : भांडुप येथे ड्रिम्स मॉलमधील तिसऱ्या मजल्यावरील सनराईज रुग्णालयामध्ये आग लागून शुक्रवारी ...पान २ वर...

# तर लॉकडाऊनची तयारी करावी

## मुख्यमंत्र्यांच्या प्रशासनाला स्पष्ट सूचना



मुंबई: राज्यातील कोविड रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस झपाट्याने वाढ होत असून, या स्थितीमुळे बेड्स, व इतर आरोग्य सुविधा अपुऱ्या पडू लागल्याचे चित्र आहे. या परिस्थितीवर तातडीने उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आज टास्क फोर्सची बैठक पार पडली. या बैठकीत लॉकडाऊनसारखे अतिशय कडक निर्बंध त्वरित लावण्यात यावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. निर्बंध आणि नियमांचे कडक पालन होणार नसेल तर येत्या काही दिवसांत संपूर्ण लॉकडाऊन लावून संसर्ग थोपवावा यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली. विशेष म्हणजे यावेळी मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अभ्यागतांना पूर्ण प्रवेशबंदी घालावी तसेच खासगी कार्यालये व आस्थापना ५० टक्के कर्मचारी संख्येचे निर्बंध पाळत नसतील तर लॉकडाऊनची तयारी करावी अशा स्पष्ट सूचना बैठकीत दिल्या.

**मंत्रालयातील तसेच शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अभ्यागतांना पूर्ण प्रवेशबंदी घालावी, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज टास्क फोर्सच्या बैठकीत दिल्या. तसेच खासगी कार्यालये व आस्थापना ५० टक्के कर्मचारी संख्येचे निर्बंध पाळत नसतील तर लॉकडाऊनची तयारी करावी असे निर्देशही त्यांनी स्पष्टपणे दिले.**

लॉकडाऊनच्या दृष्टीने प्रशासनाने नियोजन करावे- मुख्यमंत्री
यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट निर्देश दिले की, एकीकडे आपण कोविड परिस्थितीतही अर्थव्यवस्था सुरु राहील याचा आटोकाट प्रयत्न करतोय. मात्र अनेक घटक अजूनही ही गोष्ट गांभीर्याने घेत नाहीत. अजूनही खासगी कार्यालयातून उपस्थिती नियमांचे पालन होत नाही, विवाह समारंभ नियम तोडून सुरु आहेत, तसेच बाजारपेठांमध्ये देखील सुरक्षित अंतर, मास्क याचे पालन होताना दिसत नाही. शेवटी लोकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे याला आमचे प्राधान्य आहे. त्यामुळे अतिशय कठोरपणे नियमांचे पालन करावे अन्यथा लॉकडाऊन करावं लागेल, असे समजून धान्य पुरवठा, औषधी, अत्यावश्यक सेवा, वैद्यकीय सुविधा यांचे नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी मुख्य सचिवांना दिले.
ऑक्सिजन पुरवठा, खाटांचे प्रमाण त्वरेने वाढवा
गेल्या वर्षी आपण टप्प्याटप्प्याने सर्व आरोग्य सुविधा वाढवल्या, फिल्ड रुग्णालये उभारली पण आताच्या या संसर्गात या सुविधा कमी पडतील की काय अशी स्थिती निर्माण झाल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. व्हेंटीलेटर्स ...पान २ वर...

# अवैध धंद्यांवर कठोरकारवाई करा!

## पोलीस अधिकाऱ्यांना सूचना



मुंबई : पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंदे सुरू राहिल्यास संबंधित पोलीस ठाण्यातील रात्रपाळीचे पोलीस निरीक्षक, प्रभारी अधिकारी यांना जबाबदार धरून निलंबन अथवा विभागीय चौकशीची कारवाई केली जाईल. तसेच परिमंडळाच्या हद्दीत अवैध धंदे आढळून आल्यास पोलीस उपायुक्त आणि अपर पोलीस आयुक्त यांना जबाबदार धरले जाईल, अशा स्पष्ट सूचना पोलीस सह आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.
पोलीस सह आयुक्त विश्वास नांगरे पाटील कर्मचाऱ्यांना सूचना देतानाची एक ध्वनिफीत समाजमाध्यमातून प्रसारित झाली आहे. या ध्वनिफीतीत नांगरे पाटील अधिकाऱ्यांना अवैध धंद्यांवरती कडक कारवाई करून ते बंद करण्याचे आदेश देत आहेत. यामुळे मागील काही दिवसांपासून विविध प्रकरणांमुळे चर्चेत असलेल्या पोलिसांना पुन्हा जोमाने कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे.
एखाद्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत उपहारगृह, मद्यालय, पब, कुंटणखाने, हुक्का पार्लर, मसाज सेंटर, दारू, जुगार हे अवैधरित्या सुरू ...पान २ वर...

# वादळी पावसात आठ कोटींचे नुकसान



भोर,दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसासह चक्रीवादळामुळे राजगड सहकारी साखर कारखान्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. पावसात १५ हजार क्विंटल साखर भिजली असून, परिसरातील इमारतींचे पत्रे उडून गेले. विजेचे आठ ते दहा खांब पडले असून, अनेक झाडे उन्मळून पडली.पाऊस झाला. सायंकाळी साडेपाच ते सहा या दरम्यान कारखाना परिसरात तुफान पाऊस पडला. केवळ अर्ध्या तासात कारखाना परिसरातील पंधरा हजार क्विंटल साखर भिजली. परिसरातील इमारतीचे पत्रे उडून गेले. विजेच्या खाबांचेही मोठे नुकसान ...पान २ वर...

# गडचिरोली: होळीच्या दिवशी मजुरांवर काळाचा घाला; भीषण अपघातात 2 ठार

**जिल्ह्यातील आष्टी-आलापल्ली मार्गावर चौडमपल्ली जवळ असलेल्या चंदनखेडी फाट्यावर शिवशाही बस आणि पीकअप या दोन वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाल्याने दोन जण जागीच ठार झाल्याची घटना घडली**



गडचिरोली:-जिल्ह्यातील आष्टी-आलापल्ली मार्गावर चौडमपल्ली जवळ असलेल्या चंदनखेडी फाट्यावर शिवशाही बस आणि पीकअप या दोन वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाल्याने दोन जण जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत तब्बल १० जण गंभीर असून त्यांना चंद्रपूर आणि गडचिरोली येथे हलविले आहे तर उर्वरित ५ जण किरकोळ जखमी असून त्यांच्यावर आष्टी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.
प्राप्त माहितीनुसार तेलंगाणा राज्यातून मिरची तोडणाऱ्या मजुरांना घेऊन ब्रम्हपुरीकडे जाणारी पिकअप वाहन क्र. टी एस ०४ यु डी ५८४० आणि प्रवाश्यांना घेऊन भंडारा वरून अहेरीकडे येणाऱ्या शिवशाही बस क्र एम एच ४० वाय ५६०१ या दोन वाहनांमध्ये चौडमपल्ली जवळील चंदनखेडी फाट्यावर समोरासमोर धडक झाल्याने पीकअप वाहनाच्या चालकासह एक मजूर जागीच ठार झाल्याची घटना ऐन ...पान २ वर...

# भांडुप मॉल आगीप्रकरणी सर्वंकष चौकशी



भांडुप येथील 'ड्रीम्स मॉल'; तसेच मॉलमधील सनराइज रुग्णालयामध्ये आग लागून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी महापालिका प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रभात रहांगदळे यांची समिती नेमली आहे. रहांगदळे यांनी पुढील १५ दिवसांत सर्वंकष चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश पालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांनी दिले आहेत. रहांगदळे यांनी मुंबई अग्निशमन दलाचे प्रमुख म्हणून काम केले आहे. या कामाचा अनेक वर्षांचा अनुभव ...पान २ वर...

# गॅसगळतीमुळे आग, दोन महिला होरपळल्या



ठाणे, घरात गॅसगळती होऊन उडालेल्या आगीच्या भडक्यात दोन महिला भाजल्याचा प्रकार शुक्रवारी दुपारी शिळफाटा येथील दोस्ती अपार्टमेंटमध्ये घडला.दोस्ती अपार्टमेंटच्या २३व्या मजल्यावरील २३०६ क्रमांकाच्या खोलीत दुपारी १ वाजून ४० मिनिटांनी ही घटना घडली. स्वयंपाकघरात जेवण बनवत असताना गॅस सिलिंडरच्या नोझलमधून गॅसगळती होऊन घरात आग लागली. आगीची माहिती मिळाताच पोलिस तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. या आगीत नुरजा अब्दुल सलार बेंद्रेकर (७०) या ५० टक्के तर फायदा इरफान बेंद्रेकर (४५) या १८ टक्के भाजल्याची माहिती प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली. दोघींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# बँक कर्मचाऱ्यानेच केली ग्राहकांची फसवणूक



अंबरनाथ येथील बँक ऑफ बडोदा शाखेतील काही ग्राहकांचे खाते मोबाइलशी संलग्न नसल्याचा फायदा घेत, बँकेतीलच एका कर्मचाऱ्याने एका व्यक्तीशी संगनमत करत बँकेतील १२ खातेदारांच्या खात्यातून ११ लाख ६० हजार ८०० रुपयांचा परस्पर अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कर्मचाऱ्यांसह दोन जणांवर अंबरनाथ पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करत बँक कर्मचारी सुमित मंगलानी याला अटक करण्यात आली आहे.
देशभरात ऑनलाइन फसवणुकीच्या माध्यमातून नागरिकांच्या बँकेतील पैसे पळवण्याचे प्रकार वाढत असतानाच, अंबरनाथमध्ये चक्क बँकेतील कर्मचाऱ्यानेच ग्राहकांच्या खात्यातील रक्कम लुबाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अंबरनाथ पश्चिमेतील स्टेशन परिसरात बँक ऑफ बडोदाची शाखा आहे. बँकेच्या शाखेतील ज्या १२ ग्राहकांचे खाते त्यांच्या मोबाइलशी संलग्न नाही, अशा ग्राहकांना लक्ष्य करत नोव्हेंबर २०२०ते जानेवारी २०२१ या काळात बँकेतील कर्मचारी सुमित ...पान २ वर...

मानव अधिकारासाठी लढणारी एकमेव संस्था
SOCIAL RIGHTS FOUNDATION
सोशल राईटस् फाऊंडेशन
महा/2070/15 ठाणे संस्था नोंदणी अधिनियम 1860 द्वारा नोंदणी
NITI AAYOG UNIQUE ID : MH/2019/0230947

मानवी हक्क व कायदा प्रशिक्षण कार्यशाळा
भारतीय संविधानात सर्वसामान्य जनतेला जो अधिकार दिलेला आहे त्याबद्दल जनजागृती करून जनतेला त्यांच्या अधिकाराबद्दल योग्य ते प्रशिक्षण मिळावं या उद्देशाने, सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या सोशल राईट्स फाऊंडेशन या सामाजिक संघटनेने आयोजित केला आहे एक खास ऑनलाईन झूम डेमो प्रशिक्षण वर्ग.

महत्वाचे विषय
माहिती अधिकार कायदा | जमिनी संबंधित कायदे | महिला विषयक कायदे
सायबर क्राईम विषयक कायदे | विवाहबाह्य संबंध कायदा व सूट

पुढील सेमिनार - मंगळवार, 30 मार्च संध्याकाळी 7.00 pm वाजता

प्रशिक्षक : कायदेतज्ञ आकाश थाटे
सहआयोजक : संजय लाड
आयोजक : श्री दीपक नाईक (संस्थापक/अध्यक्ष - सोशल राईट्स फाऊंडेशन)

अप्रत्यक्ष रीत्या होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी,तसेच तुमच्या परिसरात जनजागृती करण्यासाठी वेळ काढून या सेमिनार मध्ये सहभागी व्हा जाणून घ्या तुमचा हक्क

व्हाट्सअप वर नावनोंदणी केल्यानंतर झूम लिंक मिळेल
https://wa.me/918424989898?text=मला%20सेमिनार%20जॉइन%20करायचा%20आहे

धन्यवाद
प्रतिनिधी-सोशल राईट्स फाऊंडेशन
संपर्क - 8424989898

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार ३० मार्च ते ०५ एप्रिल २०२१


## शेतकऱ्याचा शेड भीषण आगीत खाक



फुलंब्री, धोंदखेडा (ता. औरंगाबाद) येथील एका शेतकऱ्याच्या शेतवस्तीवरील पत्र्याच्या गोठ्यास शुक्रवारी दुपारनंतर आग लागली. या घटनेत शेतकऱ्याचे एक लाख रुपयांचे नुकसान झाले.

याबाबत अधिक माहिती अशी, की धोंदखेडा येथील शेतकरी जनार्दन वाळुबा घुगे यांची गट क्रमांक १२२मध्ये शेतजमीन आहे. या ठिकाणी त्याचे जनावराना राहण्यासाठी मोठे पत्र्याचे शेड उभारलेले होते. शुक्रवारी दुपारी एक ते दीडच्या दरम्यान शेजारच्या गायरानाला अचानक लाग लागली. आग नियंत्रणात आणण्याचे अनेकांनी प्रयत्न केले. मात्र, आगीने रौद्ररुप धारण करत घुगे यांच्या शेडलाही कवेत घेतले. यामध्ये शेडमधील धान्य, पीव्हीसी पाइप, इलेक्ट्रिक मोटार, केबल वायर, लोखंडी पत्रे खाक जाले. या घटनेची माहिती औरंगाबाद तहसील कार्यालयास देण्यात आली, मात्र शासकीय सुट्ट्या असल्याने तलाठी दुसऱ्या दिवशीही पंचनाम्यासाठी घटनास्थळी आलेले नव्हते. या आगीत सुमारे एक ते सव्वा लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचे घुगे यांनी सांगितले. या शेतकऱ्यास त्वरीत शासकीय मदत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## प्रदूषित उद्योगांत वाढ



ठाणे : मुंबई महानगर प्रदेशातील सर्वाधिक नागरीकरण असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रदूषित कारखानेही असल्याची बाब नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक सर्वेक्षण अहवालामधून समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २०२०-२१ या वर्षामध्ये ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई या विभागात समाविष्ट असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यांतील सुमारे १५ हजार ९३१ कारखान्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यामध्ये प्रदूषित कारखान्यांच्या तीव्रतेनुसार त्यांना लाल, नारंगी, हिरवा आणि पांढरा रंग देण्यात आला आहे. २०१९-२०मध्ये या भागातील ४ हजार २५८ कारखाने लाल रंगामध्ये समाविष्ट झाले होते. तर यंदा ही संख्या ४८३ने वाढून ४ हजार ७४१ झाली आहे. प्रदूषण विरहित कारखान्यांचा आकडाही दुप्पट वाढल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, कारखान्यांच्या संख्येमध्ये अव्वल असलेल्या पुणे जिल्ह्यामध्येही प्रदूषित कारखान्यांची संख्या ठाणे-पालघरपेक्षा कमी आहे.

मुंबई महानगर प्रदेशामध्ये समाविष्ट असलेल्या ठाणे-पालघर जिल्ह्यात दाट लोकवस्ती असून कारखान्यांची संख्याही या भागात जास्त आहे. ठाणे शहरातील औद्योगिक कारखान्यांची संख्या कमी झाली असली तरी डोंबिवली, पालघर, नवी मुंबईमध्ये कारखान्यांची संख्या मोठी आहे. औद्योगिक क्षेत्रात समाविष्ट असलेल्या या कारखान्यांच्या क्षमतेनुसार त्यांची मोठे, लहान आणि मध्यम अशी वर्गवारी केली जाते. त्याचप्रमाणे प्रदूषण नियंत्रण मंडळ या कारखान्यांच्या प्रदूषण निर्देशांकानुसार त्यांचे लाल, नारंगी हिरव्या आणि पांढऱ्या रंगामध्ये विभाजन करते. यामध्ये या भागात लाल रंगाचे कारखाने राज्यामध्ये सर्वाधिक असून गतवर्षीपेक्षा यंदा प्रदूषित कारखान्यांची संख्या ४७५ने वाढली आहे.

राज्यातील २५ औद्योगिक वसाहतींमधील १ लाख १ हजार ९४८ उद्योग असून त्यापैकी ठाणे-पालघर या दोन जिल्ह्यांमध्ये १५ हजार ९३१ उद्योगांचा समावेश आहे. यापैकी २९ टक्के उद्योग म्हणजे ४ हजार ७४१ कारखान्यांमधील प्रदूषण निर्देशांक ६० टक्क्यांपेक्षा जास्त आहे.

## मोकाट कुत्र्याचा बालकांवर हल्ला



सिडको, सिडकोतील, राजरत्न नगर परिसरात पाच वर्षांच्या दोन बालकांना कुत्र्याने हल्ला करीत जखमी केले. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मात्र, महापालिका प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

प्रभाग क्रमांक २९ मधील राजरत्न नगर परिसरात मेघराज शिवाजी परदेशी हा पाच वर्षांचा चिमुकला घराबाहेर खेळत असताना पिसाळलेल्या कुत्र्याने त्याच्यावर हल्ला केला. कुत्र्याने त्याच्या हाताला, मांडीला तसेच पायाला चावा घेऊन जखमी केले. मेघराज ओरडू लागल्याने घरातील माणसे बाहेर आली. या नंतर कुत्र्याने पळ काढला. याच कुत्र्याने पुढे जाऊन रुद्र अभिजित सांबरे या पाच वर्षांच्या चिमुकल्यावरही हल्ला करून त्याला जखमी केले. यानंतर सांबरे कुटुंबीयांनी त्याला औषध उपचारासाठी रुग्णालयात नेले.

यापूर्वीही, प्रभाग २९ मध्ये मोकाट कुत्र्यांचा प्रश्न कायमचा झालेला आहे.

मागील काही दिवसांपूर्वी ही सात वर्षांच्या बालिकेवर या मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याने ती गंभीर जखमी झाली होती. मोकाट कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी कायमस्वरूपी उपाय करण्याची मागणी नागरिकांकडून होते. मात्र, एखादी घटना घडली की लोकप्रतिनिधी येऊन तात्पुरत्या स्वरूपात कुत्रे पकडणारी गाडी पाठवितात. यानंतर पुन्हा परिस्थिती 'जैसे थे'च होते. कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

मोठ्या प्रमाणात पिसाळलेल्या कुत्र्यांचा महापालिका प्रशासनाने लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी केली जात आहे.

घराबाहेर निघाले की कुत्र्यांची भीती वाटते. सकाळी माझ्या मुलावर कुत्र्यांनी हल्ला केला. सुदैवाने तो थोडक्यात बचावला. अन्यथा कुत्र्याने त्याला अजून जखमी केले असते. यापूर्वीही असा प्रकार घडला आहे; मात्र कोणीही लक्ष देत नाही.

## अवैध धंद्यांवर कठोरकारवाई करा!



मुंबई : पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध धंदे सुरू राहिल्यास संबंधित पोलीस ठाण्यातील रात्रपाळीचे पोलीस निरीक्षक, प्रभारी अधिकारी यांना जबाबदार धरून निलंबन अथवा विभागीय चौकशीची कारवाई केली जाईल. तसेच परिमंडळाच्या हद्दीत अवैध धंदे आढळून आल्यास पोलीस उपायुक्त आणि अपर पोलीस आयुक्त यांना जबाबदार धरले जाईल, अशा स्पष्ट सूचना पोलीस सह आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. पोलीस सह आयुक्त विश्वास नांगरे पाटील कर्मचाऱ्यांना सूचना देतानाची एक ध्वनिफीत समाजमाध्यमातून प्रसारित झाली आहे. या ध्वनिफीतीत नांगरे पाटील अधिकाऱ्यांना अवैध धंद्यांवरती कडक कारवाई करून ते बंद करण्याचे आदेश देत आहेत. यामुळे मागील काही दिवसांपासून विविध प्रकरणांमुळे चर्चेत असलेल्या पोलिसांना पुन्हा जोमाने कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे.

एखाद्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत उपहारगृह, मद्यालय, पब, कुंटणखाने, हुक्का पार्लर, मसाज सेंटर, दारू, जुगार हे अवैधरित्या सुरू राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईला सामोरे जावे लागले, असा इशारा नांगरे पाटील यांनी दिला आहे. त्याचबरोबर अवैध धंदे शंभर टक्के बंद करून त्यामध्ये गुंतलेल्या आणि अमली पदार्थांच्या तस्करीत सामाविष्ट आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे.

## डमी विद्यार्थ्यांनी दिली तलाठी पदासाठी परीक्षा; बनवाबनवी अशी झाली उघड



पुणे: गेल्या वर्षी जुलै महिन्यात महापोर्टलवरून घेण्यात आलेल्या तलाठीपदाच्या परिक्षेमध्ये दोन विद्यार्थ्यांच्या जागी डमी विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी चार जणांच्या विरोधात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अहमदनगर येथील तहसीलदार माधुरी आंधळे यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार नेमीचंद विठ्ठलसिंग ब्रम्हनात (वय ३९, रा. औरंगाबाद) आणि रामेश्वर विठ्ठल जरवाल (वय २७) आणि या दोघांच्या नावावर परीक्षा देणारे दोन अशा चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आंबेगाव बुद्रुक येथील संकल्प बिजनेस स्कूल येथे १९ जुलै २०१९ रोजी हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहमदनगर जिल्ह्यात तलाठी पदासाठी ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले होते. या पदासाठी महापोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन परिक्षा घेण्यात आली होती.

या परीक्षेचे केंद्र आंबेगाव बुद्रुक येथील संकल्प बिझनेस स्कूल हे होते. नेमीचंद ब्रम्हनात व रामेश्वर जरवाल या दोघांचे तलाठी पदासाठी ऑनलाइन परिक्षेचे केंद्र हे या ठिकाणीच होते. या दोघांनी परीक्षेसाठी अर्ज केला असताना त्यांच्या नावाने दुसऱ्याच विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. नगर जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत चौकशी झाली. त्यावेळी हा प्रकार लक्षात आला. त्यानंतर तत्काळ नगर येथील कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. कोतवाली पोलिसांनी शुन्य क्रमांकाने गुन्हा दाखल करून तो भारती विद्यापीठ पोलिसांकडे वर्ग केला आहे.

## गृहराज्यमंत्री सतेज पाटील यांच्यावर पुन्हा गंभीर आरोप!



कोल्हापूर: सयाजी हॉटेल, ड्रीमवर्ल्ड वॉटरपार्कचा घरफाळा चुकविणारे राज्याचे गृहराज्यमंत्री व कोल्हापूरचे पालकमंत्री सतेज पाटील यांनी साळोखेनगर येथील त्यांच्या डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेच्या शाळा व कॉलेज इमारतीचा सात वर्षे घरफाळाच भरला नाही व इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र न घेताच कॉलेज सुरू ठेवल्याचा आरोप माजी नगरसेवक सुनील कदम व सत्यजीत कदम यांनी पत्रकार परिषदेत केला.

कोल्हापुरात गेले महिनाभर घरफाळा विषयावरून गृहराज्यमंत्री सतेज पाटील व माजी खासदार धनंजय महाडिक यांच्यात संघर्ष सुरू आहे. मंत्र्यांनी सयाजी हॉटेलचा १५ कोटींचा घरफाळा बुडविल्याचा आरोप महाडिक यांनी केला होता. त्यानंतर पाटील समर्थकांनी हा आरोप खोटा असल्याचे सांगत महाडिक यांच्यावरही अनेक आरोप केले. या पार्श्वभूमीवर कदम बंधूनी गुरुवारी पत्रकार परिषद घेतली. महापालिकेचा घरफाळा बुडविण्यात पालकमंत्री आघाडीवर असून या प्रकरणी त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

सुनील कदम म्हणाले, प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या जागेवर मंत्र्यांनी इंजिनीअरिंग कॉलेज सुरू केले. सात वर्षांपासून येथे कॉलेज सुरू आहे. मात्र अद्याप त्याचे भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही.

सात वर्षांत एक रुपयाही घरफाळा भरला नाही. महापालिकेच्या महसूलावर दरोडा घालणारे हे मंत्री आहेत. सत्तेच्या जोरावर दादागिरी करत ते अधिकारी व कर्मचाऱ्यांना दम देतात. हे राज्यमंत्री आहेत म्हणून यांना वेगळा कायदा आहे का असा सवाल करून कदम म्हणाले, सध्या याच इमारतीत विनापरवाना बांधकाम सुरू आहे. गेल्या दहा वर्षांपासून त्यांचा मनमानी कारभार सुरू आहे.

महापालिकेत प्रशासनाने दोनशे कोटीचा घरफाळा घोटाळा केल्याचा आरोप करून कदम म्हणाले, आठ वर्षे या विभागाचे लेखापरिक्षण केले नाही.

हिम्मत असेल तर प्रशासनाने गृहराज्यमंत्र्याकडून घरफाळा वसूल करावा. सर्वसामान्य जनतेला एक न्याय आणि मंत्र्यांना एक न्याय असे वागू नये.


## पृष्ठ १ वरुन


### 'शिवनेरी'कडे प्रवाशांची पाठ

कमी होऊ लागले आहे. मुंबई आणि पुणे या दोन शहरांदरम्यान कामानिमित्त एसटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या अधिक असते. या मार्गावर एसटी महामंडळाच्या धावणाऱ्या शिवनेरी गाड्यांना तर शुक्रवार ते रविवार चांगला प्रतिसाद मिळतो. मात्र करोनामुळे मार्च २०२० पासून एसटीच्या सेवेकडे प्रवाशांनी पाठच फिरवली. टाळेबंदीमुळे तर एसटी सेवाही ठप्प राहिली होती. परिणामी एसटीचे उत्पन्न बुडाले. यात शिवनेरीलाही फटका बसला होता. टाळेबंदी शिथिल झाल्यानंतर हळूहळू एसटीची सेवा पूर्ववत झाली होती. त्यात मुंबई व पुणे शहरातील करोना रुग्णांची संख्या कमी होताच या दोन शहरांदरम्यान प्रवास करणारे प्रवासीही मिळू लागले. परंतु मार्च २०२१ पासून पुन्हा करोना रुग्णसंख्या वाढताच प्रवासी कमी होऊ लागले आहेत. वाढती रुग्णसंख्या व प्रवासी कमी असतानाही त्या दृष्टीने एसटी नियोजन करताना मात्र दिसत नाही. त्यामुळे खर्चही वाढत आहे.

तीन महिन्यांत… जानेवारी २०२१ मध्ये ७६ शिवनेरी मुंबई ते पुणे मार्गावर धावत होत्या. प्रत्येक दिवशी एकू ण २ हजार ७३० प्रवासी प्रवास करत. त्यामुळे १३ लाख ३४ हजार रुपये उत्पन्न एसटीला मिळत होते. फेब्रुवारीत ७८ शिवनेरीतून दिवसाला २ हजार ८७० प्रवासी मिळू लागले. परंतु मार्च महिन्यात हीच संख्या कमी झाली. पुन्हा ७६ शिवनेरींमागे प्रत्येक दिवशी २,४०० प्रवासी प्रवास करत आहेत. प्रवासी कमी झाल्याने एसटीच्या तिजोरीत उत्पन्नही ११ लाख ६८ हजारापर्यंत आले आहे.गेल्या वर्षी…

फे ब्रुवारी २०२० मध्ये एकू ण ११० शिवनेरींमागे सात हजार प्रवासी दर दिवशी प्रवास करत होते. त्यामुळे ३२ लाख रुपयांचे उत्पन्न एसटीला मिळत होते. तेच उत्पन्न कमी झाले आहे.

### चौकशी अहवाल 15 दिवसांत

दुर्घटना घडली. या आगीबाबत सर्वंकष चौकशी करून त्याचा अहवाल पुढील पंधरा दिवसांत सादर करण्याचे आदेश पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी दिले आहेत. या आगीची चौकशी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रभात रहांगदळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ड्रीम्स मॉलमध्ये लागलेल्या आगीत दहा रुग्णांचा मृत्यू झाला. या मॉलमध्ये करोना रुग्णांसाठी तात्पुरते रुग्णालय उभारण्यात आले होते. अग्निरोधक यंत्रणा नसताना तसेच मॉलमध्ये अनेक त्रुटी असताना त्यात रुग्णालय उभारण्यासाठी परवानगी कशी दिली, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर दुर्घटनेच्या चौकशीला विशेष महत्त्व आले आहे. ड्रीम्स मॉल घटनेतील आगीचे नेमके कारण काय, त्याबाबत प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्यासोबत सल्लामसलत करून कारणांची स्पष्टता करणे. मॉल तसेच त्यातील सनराईज रुग्णालयाला आवश्यक त्या सर्व परवानगी देण्यात आल्या होत्या का, त्याची पडताळणी करून, दिलेल्या नसल्याचे आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करणे, अग्निसुरक्षा पालनाबाबतच्या उपाययोजना करण्यात मॉलचे मालक व व्यवस्थापन तसेच रुग्णालयाचे व्यवस्थापन यांच्याकडून काही त्रुटी राहिल्या होत्या का, ते शोधून काढणे, अग्निशमन कार्यात काही त्रुटी होत्या का, त्याची कारणे शोधून काढणे या घटनेच्या अनुषंगाने इतर काही संदर्भित मुद्दे असल्यास ते आणि भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून योग्य त्या शिफारशी सुचवण्याबाबतही सांगण्यात आले आहे. या सर्व मुद्द्यांचा सविस्तर अहवाल १५ दिवसांत सादर करण्याचे आदेश महापालिका आयुक्त चहल यांनी दिले आहेत. ४० तासांनंतर आगीवर नियंत्रण ड्रीम्स मॉलमध्ये गुरुवारी मध्यरात्री बाराच्या सुमारास लागलेली भीषण आग ४० तासांनंतर पूर्णत: विझली. शनिवारी दुपारी सव्वातीन वाजता आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले. या रुग्णालयात ७५ रुग्ण दाखल होते. त्यापैकी दोन रुग्ण रोनाने दगावले होते. त्यांचे मृतदेह या आगीत जळाले आहेत, तर अन्य नऊ रुग्णांचा गुदमरून मृत्यू झाला. उर्वरित रुग्णांपैकी ४६ रुग्णांना अन्यत्र हलवण्यात आले होते, तर २२ रुग्ण दुर्घटनेनंतर घाबरून पळाले होते. त्यापैकी ज्या रुग्णांची प्रकृती स्थिर होती त्यांना घरीच अलगीकरणात राहायला सांगितले आहे. ज्यांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज होती त्यांना पालिके च्या रुग्णालयात दाखल केल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली. २७ जणांची प्रकृती स्थिर दुर्घटनेच्या रात्री दोनच्या सुमारास रुग्णांना आणण्यास सुरुवात झाली. हजार खाटांचा एक विभाग रुग्णांनी पूर्ण भरल्यामुळे नवीन विभाग शुक्रवारपासून सुरू करण्यासाठी आम्ही तयार ठेवला होता. त्यामुळे या रुग्णांना लगेचच तेथे दाखल करता आले. रुग्णांना दिलेल्या उपचारांची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नव्हती.

### अवैध धंद्यांवर

राहिल्यास संबंधित अधिकाऱ्यांना कारवाईला सामोरे जावे लागले, असा इशारा नांगरे पाटील यांनी दिला आहे. त्याचबरोबर अवैध धंदे शंभर टक्के बंद करून त्यामध्ये गुंतलेल्या आणि अमली पदार्थांच्या तस्करीत सामाविष्ट आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जावी, अशी सूचनाही त्यांनी केली आहे. तसेच रात्रीची गस्त सक्षमपणे झाली पाहिजे, अशी सूचना नवनियुक्त पोलीस आयुक्तांनी दिल्याचे नांगरे पाटील अधिकाऱ्यांना सांगत आहेत.

### तर लॉकडाऊनची तयारी करावी

पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहतील तसेच ऑक्सिजन उत्पादन ८० टक्के वैद्यकीय व २० टक्के इतर कारणांसाठी राखीव ठेवावे, रुग्णालयांतील खाटांच्या बाबतीत ८०:२० प्रमाणे अंमलबजावणी होते किंवा नाही व रुग्णांची गैरसोय होणार नाही हे पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. ई आयसीयूचा मोठ्या प्रमाणावर सुलभतेने वापर होऊ शकतो त्यामुळे त्यादृष्टीने देखील आरोग्य विभागाने त्वरित पाउले उचलावीत असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. केवळ मुंबई, पुणे नाही तर उर्वरित ठिकाणीही सुविधा हवी लोकांना कोरोनापेक्षा देखील आपली चाचणी पॉझिटिव्ह आली तर कुठल्याही विलगीकरण केंद्रात नेऊन टाकले जाईल व आपल्याला तिथे सुविधा मिळणार नाही अशी भीती आहे, ती त्वरित काढणे गरजेचे आहे असेही मुख्यमंत्री म्हणाले. ग्रामीण भागात सुविधा नसतील तर नजीकच्या शहरातील किंवा परिसरातील सुविधा मिळावी अशी व्यवस्था करा, तसेच केवळ मुंबई-पुणे यावर लक्ष केंद्रित न करता राज्याच्या सर्व भागात विलगीकरण सुविधा तसेच आरोग्य सुविधा कमी पडणार नाही हे पाहण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

### वादळी पावसात आठ

झाले. कारखान्याच्या गोदामात गेल्या वर्षीची शिल्लक साखर ठेवण्यात आली आहे. यामुळे या वर्षीच्या हंगामातील साखरेची पोती कारखान्याच्या मोकळया जागेत रचून ठेवण्यात आली होती. त्यावर ताडपत्रीचे आच्छादन करण्यात आले होते. मात्र, जोरदार पावसात ही सर्व साखर भिजली. साखरेभोवती पाण्याचे तळे साचले होते.

### गडचिरोली: होळीच्या दिवशी मजुरांवर

होळीच्या दिवशी घडली.

पिकअप वाहनात एकूण १७ मजूर होते. त्यापैकी दोन जण जागीच ठार झाले तर १० जण गंभीर जखमी असल्याने त्यांना चंद्रपूर आणि गडचिरोलीला नेण्यात आले असून उर्वरित ५ जण किरकोळ जखमी असल्याने ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे उपचार घेत असल्याची माहिती आहे.

### बँक कर्मचाऱ्यानेच केली

मंगलानी आणि त्याचा साथीदार गुप्ता यांनी संगनमत करून ग्राहकांच्या खात्यांतील ११ लाख ६० हजार ८०० रुपये परस्पर गुप्ता याच्या खात्यात वळवले आहेत. बँक कर्मचारी आणि गुप्ता यांनी बँक आणि ग्राहकांची आर्थिक फसवणूक केल्याचा हा सर्व प्रकार बँक मॅनेजर प्रभाकर नितनवरे यांच्या निदर्शनास आला असता, त्यांनी तात्काळ अंबरनाथ पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी सुमित मंगलानी याला अटक केली असून, त्याचा साथीदार गुप्ता याचा पोलिस शोध घेत आहेत.

### भांडुप मॉल आगीप्रकरणी सर्वंकष चौकशी

विभागाचे विद्यमान उपायुक्त असून आपत्तीशी लढताना व भविष्यात अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना यासंबंधीचे त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जाणार आहे. **आग ४० तासांनंतर आटोक्यात** मुंबई : भांडुप येथील ड्रिम्स मॉलमध्ये गुरुवारी रात्री ११.३० च्या सुमारास लागलेली भीषण आग तब्बल ४० तासांनंतर शनिवारी दुपारी ३.२९ वाजता आटोक्यात आली. आगीची पालिका, पोलिस, अग्निशमन दल यांच्यामार्फत सखोल चौकशी सुरू झाली असून या चौकशीत आगीचे नेमके कारण काय व कुणाचा निष्काळजीपणा नडला हे स्पष्ट होणार आहे. या आगीची झळ मॉलच्या तिसऱ्या मजल्यावरील सनराईज रूग्णालयाला बसल्याने तेथील ११ करोना बाधित रुग्णांना जीव गमवावा लागला. अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल ४० तास अथक प्रयत्न करून २० फायर इंजिन, १५ जंबो वॉटर टँकर, ३ वॉटर टँकर, २ उंच शिड्या व १५० कर्मचार्यांच्या सहाय्याने आगीवर शनिवारी रात्रीपर्यंत नियंत्रण मिळवले.



## संपादकीय...

# कलमेश्वरांचे 'शुक्ला'काष्ठ!

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राम गणेश गडकरी यांचे 'राजसंन्यास' बहुधा वाचले नसावे. नपेक्षा प्रशासनातील अधिकाऱ्यांवर विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न त्यांना पडता ना. राज्य प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी राजकारण्यांचे दूरध्वनी चोरून ऐकले आणि तो सारा ऐवज माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला, असा वहीम आहे. याचा साधा अर्थ असा की 'आलेल्या' मुख्यमंत्र्यांपेक्षा 'मी पुन्हा येईन' असे म्हणणाऱ्यावर या अधिकाऱ्यांचा अधिक विश्वास असावा. हे असे झाले म्हणून राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत संताप व्यक्त झाला आणि अशा उद्योगी अधिकाऱ्यांना धडा शिकविण्याची मनीषा अनेकांनी व्यक्त केली. ती अयोग्य म्हणता येणार नाही. पण त्याआधी हे असे का होते वा झाले याचा विचार व्हायला हवा. त्यासाठी मुख्यमंत्र्यांना 'राजसंन्यास' उपयोगी ठरेल. ''वारुळातली दोन जिभांची पिवळी नागीण चावली तर एकाच पिढीचा घात होतो; पण कारकुनी कानावरची ही दोन जिभांची काळी नागीण डसली तर सात पिढ्यांचा सत्यानाश करते. शाईचा सोमरस आणि लेखणीची समिधा करून एखाद्याची आहुती



घेण्यासाठी कारकुनाने एक ओळ खरडली की ती वेदवाक्य...'' असे वैश्विक सत्य 'राजसंन्यासा'तील जिवाजी कलमदाने नोंदवून गेला त्याची प्रचीती जे काही झाले त्यातून येते. अधिकाऱ्यांच्या या राजनिष्ठांचे विच्छेदन दोन मुद्द्यांवर व्हायला हवे.

पहिला प्रशासकीय सुधारणांचा. आपल्याकडे त्या झालेल्या नाहीत. त्यामुळे पारतंत्र्याच्या काळात ज्या उद्देशाने प्रशासकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था तयार केली गेली तो उद्देश संपुष्टात आल्यानंतरही या व्यवस्थेत व्हायला हवे होते तसे बदल अजिबात झाले नाहीत. परिणामी 'भारतीय प्रशासकीय सेवे'तील (इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सव्हिस, आयएएस) अधिकाऱ्यांचा 'राजापेक्षा राजनिष्ठ' असा एक गट बनला आणि व्यवस्थेचाच भाग बनून आपला सेवा आणि सेवोत्तर काळ सुखेनैव कसा व्यतीत करता येईल याच्याच प्रयत्नात राहिला. सत्तेवर कोणीही असो. वातकुक्कुटी कौशल्यामुळे हे अधिकारी नेहमीच सत्तावर्तुळात राहतात. याचा परिणाम अन्यांवर होत असतो. प्रामाणिकपणा, होयबा वृत्तीस नकार आदी मूल्ये पाळणारे अधिकारी बाजूस फेकले जातात. हे प्रशासनाच्या सर्व अंगांबाबत होते. हा मुद्दा आपल्या व्यावसायिक नैतिकतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्युलिओ रिबेरो यांच्या आजच्या सहसंपादकीय पानावरील लेखात योग्य रीतीने अधोरेखित होतो. या लेखात ते मुंबई पोलीस आयुक्तपदी परमबीर सिंह यांची नियुक्ती कशी झाली हे स्पष्ट करतात. हा दुर्गुण सर्वपक्षीय.

म्हणजे हे असे प्रकार टाळता यावेत म्हणून प्रशासकीय सुधारणा महत्त्वाच्या. आपल्याकडे त्यासाठी १९६६ आणि नंतर थेट २००५ असा दोनदाच प्रयत्न झाला. त्यात काहीच झाले नाही असे नाही. पण या सुधारणांचा वेग आणि आवाका हवा तितका नाही, हे खरेच. त्याचमुळे प्रशासकीय अधिकारी हे सत्ताधारी आणि सत्ताधारीधार्जिणे उद्योग वा व्यावसायिक यांच्याशी संधान बांधतात आणि सुखेनैव हवे ते(च) करीत राहतात. तेव्हा यास प्रतिबंध करणारी व्यवस्था तयार व्हायला हवी. भारतीय लष्करात कोणीही आपल्या ज्येष्ठास डावलून त्याच्या वरिष्ठांकडे वा सत्ताधीशांकडे गेल्यास त्याच्यावर कडकातील कडक कारवाई होते. हा नियम पोलीस वा प्रशासनास लागू का नाही? व्यवस्थापन वादात टाटा स्टीलचे (पूर्वीची टिस्को) एके काळचे सर्वेसर्वा रुसी मोदी यांनी बिहारच्या सत्ताधीशांच्या मदतीने समूहावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दबावाखाली येणे दूरच, पण टाटा समूहाने मोदी यांना तातडीने बाहेरचा दरवाजा दाखवला. त्यांची आज ना उद्या होणारी गच्छंती त्यामुळे तातडीने घडवून आणली गेली. हे लष्करात वा खासगी क्षेत्रात होऊ शकते तर प्रशासकीय क्षेत्रात का नाही? याच्या जोडीने निवृत्तीनंतर वा निवृत्तीनजीक सेवात्यागानंतर राजकीय वा खासगी उद्योग क्षेत्रांत रुजू होण्यास प्रशासकीय अधिकाऱ्यांवर काही किमान काळाचे निर्बंध हवेत. आज काही उद्योगसमूह हे ज्येष्ठ निवृत्त प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आश्रयस्थान बनले आहेत. हा नियम बँकांचे प्रमुख वा न्यायाधीश यांनाही हवा. देशातील एका सर्वात बलाढ्य सरकारी बँकेच्या निवृत्त प्रमुख अलीकडेच एका सर्वव्यापी उद्योगात संचालकपदी दाखल झाल्या. आज तीच बँक या उद्योगसमूहाची उत्पादने आपल्या शाखांतून विकते वा त्यांचा प्रसार करते. हादेखील भ्रष्टाचारच.

तो थांबवण्याचा विचारदेखील आपल्याकडे अद्याप नाही. प्रत्यक्ष रोखणे दूरच. हा एक भाग. दुसरा मुद्दा राजकीय पक्षांच्या दीर्घकालीन धोरणांचा. याचाही विचार मुख्यमंत्री ठाकरे यांनी करायला हवा.

# आश्वासकतेचे 'भूषण'



प्रदीर्घ आणि समृद्ध अशा भारतीय सांगीतिक संस्कृतीचे अप्रूप जगातल्या अनेक संस्कृतींना आजही वाटते, याच्या अनेक कारणांमध्ये 'आशा भोसले' हेही एक महत्त्वाचे कारण आहे. संगीताच्या क्षेत्रात सुखी अपघात घडून येण्याला महत्त्व असते. आशा भोसले या कलावतीच्या बाबतीत असा सुखी अपघात घडून आला आणि हे जग एका आतुर, संवेदनशील, तरतरीत, टवटवीत, मधाळ आणि खट्याळ अशा स्वरांच्या मिठीत अलगदपणे जाऊन कधी विसावले, ते कळलेही नाही. त्यांना यंदाचा 'महाराष्ट्र भूषण' हा मानाचा सन्मान जाहीर झाला, तेव्हा त्यांच्या स्वरांच्या हिंदोळ्यावर गेली सात दशके आंदोलन घेत राहिलेले त्यांचे चाहते आणि दर्दी पुन्हा एकदा मोहरून गेले आहेत. या पुरस्कारासाठी त्यांचे अभिनंदन करत असताना, त्यांच्या आजवरच्या प्रदीर्घ आणि अतिशय रसरशीत अशा कारकीर्दीचे साक्षीदार असलेल्या कोट्यवधी मराठी रसिकांचे ऊर भरून येणे, ही अगदीच स्वाभाविक घटणारी घटना. सुरेल आवाजाची निसर्गदत्त देणगी लाभलेल्या या जगातील प्रत्येकाला 'आशा भोसले' का व्हायचे असते आणि का होता येत नाही, याचा शोध घ्यायचा झाला, तर त्याचे उत्तर त्यांच्या नवनिर्मितीच्या ध्यासात सापडेल. त्या गायला लागल्या, तेव्हा भारतीय चित्रपटाचे पार्श्वसंगीत चांगलेच बाळसे धरू लागले होते. शमशाद बेगम, गीता दत्त आणि थोरली बहीण लता मंगेशकर यांनी ललित संगीताचा सारा आसमंत व्यापून टाकला होता. अशात आपली नाममुद्रा तयार करून त्याचे सुवर्ण मोहरेत रूपांतर करण्यासाठी केवळ हिंमत असून चालणार नव्हते, तर त्याच्या बरोबरीने आपल्यातील सर्जनाची मशागत करण्याची तयारीही लागणार होती. आशाताईंकडे ती होती, म्हणूनच त्यांना प्रदीर्घ काळ आपल्या स्वरांची जादू पसरवता आली. आयुष्यात येणाऱ्या सुखदु:खाच्या अनेकविध घटनांमध्ये आशाताईंचा आश्वासक स्वर सगळ्या मराठीजनांना सतत जगण्याची प्रेरणा देत राहिला, जगणे शिकवत राहिला आणि हे जग किती सुंदर आहे, याची पुन:पुन्हा साक्ष देत राहिला.

संगीताला भाषा नसते, ते सातासमुद्रापार सहज पोहोचू शकते, हे खरेच. परंतु संगीताची निर्मिती ज्या मातीतून होते, त्या मातीशी त्याची असलेली नाळही सुटत नाही. आशाताईंनी ही नाळ अधिक दृढ केली आणि आपल्या सगळ्यांना एका स्वरसुंदर जगाची ओळख करून दिली. दिवसाच्या सगळ्या प्रहरांत त्यांच्या किती तरी गाण्यांनी प्रत्येकाला समृद्ध केले. मग ते लडिवाळपणे गायलेले 'दादा मला एक वहिनी आण' असो की 'झुकझुक झुकझुक आगीन गाडी' असो. ही गाणी घरातल्या प्रत्येक खोलीतल्या प्रत्येकाशी संवाद साधत होती. कुणाची बहीण, कुणाची सखी, कुणाची प्रियतमा, कुणासाठी झुरणारी विरहिणी, कुणाच्या देवघरातील मंदपणे तेवत राहणारी समईची ज्योत, तर कु णाबरोबर अल्लडपणे खेळणारी परकरी पोर. आशाताईंच्या स्वरांत हे सारे भाव अतिशय तरलपणे व्यक्त होतात आणि त्या स्वत:च ते गीत बनून जातात.

हे असे गाण्यात पूर्ण विरघळून गेल्याशिवाय 'नाच रे मोरा'तला मोर होता येत नाही आणि जिवाच्या आकांताने 'जिवलगा...' आठवणींतला व्याकूळ भाव पोहोचवता येत नाही.

असे किती रंग आणि त्याच्या किती रंगीबेरंगी छटा! त्यातल्या प्रत्येकाला न्याय द्यायचा, तर ते गीत हृदयात झिरपायला हवे. ते आकळून यायला हवे. केवळ संगीतकाराने सांगितलेली स्वररचना त्याला हवी तशी गाऊन हे साध्य होणारे नाहीच, हे आजकालच्या दूरचित्रवाणीवरील अनेक कार्यक्रमांमुळे सहज कळू शकते. आशाताईंनी स्वररचना 'जशाच्या तशा' गायल्या नाहीत, त्याला जीव लावला. त्या रचनांना काय सांगायचे आहे आणि कसे, हे समजून घेतले. त्यात आपली प्रतिभा पुरेपूर ओतली, तेव्हा कुठे त्या रचनेतल्या भावाचे आणि अर्थाचे अनेक पदर ऐकू गेले. हेच त्यांच्या प्रत्येक हिंदी चित्रपट गीतात, गझलेत सहजपणे दिसते.

नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या प्रत्येकाला आपल्या कलाकृतीसाठी देखणे कोंदण हवे असते. संगीत रचनाकारांसाठी तर अशी रेखीव महिरप अधिकच मोहाची. केवळ हार्मोनिअमवर चाल म्हणून दाखवायची आणि ती म्हणायला लावायची, अशा मार्गात काही तरी हातचे सुटून जाते. ते पकडून ठेवण्यासाठी गायक कलावंतालाही निर्मितीची ओढ असावी लागते. आशाताईंसाठी गाणी स्वरबद्ध करणारे एकजात सगळे संगीतकार एवढे नशीबवान की, त्यांच्या मनातले गाणे ओळखून गाऊ  शकणारी एक अपूर्व अशी कलावती त्यांच्या परिसरात होती. गीतांचे असे झळाळते सोने होताना पाहणे, ऐकणे यापरते दुसरे समाधान असूच शकत नाही. हे सारे संगीतकार म्हणूनच आशाताईंच्या ऋणात राहणे पसंत करतात. दत्ता डावजेकर ते श्रीधर फडके  असा संगीतकारांचा एक अतिशय विस्तीर्ण पट आशाताईंनी पाहिला आहे. त्या गातात तेव्हा त्या सुधीर फडके होतात आणि हृदयनाथ मंगेशकरही होतात.

आवाजावर हुकमत अशी की, कोणत्याही गीताचे आव्हान लीलया पेलता येईल. त्यामुळेच पिताश्री मास्टर दीनानाथ यांच्यासारख्या पेचदार कलावंताने अजरामर करून ठेवलेल्या नाट्यसंगीताचाही मोह त्यांना आवरता येत नाही. 'विलोपले मधु मीलनात या', 'शूरां मी वंदिले', 'चंद्रिका ही जणू' यांसारख्या नाट्यपदांच्या वाटेला जाण्यासाठी आयुष्यभराची तालीमही कमी पडेल. मात्र आशाताईंनी हे आव्हान स्वीकारले. अभिजात संगीताचे रीतसर शिक्षण मिळणेही दुरापास्त असताना त्यांनी केलेले हे धाडस, त्यांच्या स्वभावाचे दर्शन घडवणारे.

जगण्याच्या स्पर्धेत कल्पनाही करता येणार नाही, अशा दु:स्वप्नांशी दोन हात करता करता, आशाताईंनी आपल्या जगण्याचा तोराच असा काही बदलला की, जीवनातील आर्तता, कारुण्य, भय, चिंता यांसारख्या भावनांवर विजय मिळवत बिनधास्त, क्वचित छचोर आणि अवखळ बनण्याचे सामर्थ्य हस्तगत केले. त्यामुळेच 'रेशमांच्या रेघांनी' या गाण्यातल्या त्यांच्या थिरकणाऱ्या स्वरांना जमिनीपासून उंच उडता येतं.

'केव्हा तरी पहाटे, उलटून रात्र गेली' या गीतातील कातर हुरहुर, 'मलमली तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे' या गीतातील धगधगती ज्वानी, 'मी मज हरपुन बसले ग'मधील शृंगार, 'प्रभाते सूर नभी रंगती' या गीतातील भक्ती, चांदणे शिंपण्यातला तोरा आणि वागेश्वरीला अभिवादन करतानाचा आर्ष भाव... जगण्याचे हे सारे रंग अतिशय उत्कटपणे जगण्याची त्यांची ऊर्मी त्यांच्या प्रत्येक गाण्यात पुरेपूर उतरलेली दिसते. म्हणून, असे जगता यायला हवे, या जाणिवेने ऐकणाऱ्या प्रत्येकालाही नवचैतन्याचा साक्षात्कार होतो. कष्ट, वेदना, दु:ख, क्लेश हे तर सगळयांच्याच वाट्याला येतात. त्याने विदीर्ण होता होता, त्याचेच सौंदर्यात रूपांतर करता येणे सगळयांनाच कसे जमेल?

आशाताईंना मात्र ही अपूर्वाई शक्य झाली. त्यामुळे समस्त मराठी मनांना कैवल्याचा आनंद प्राप्त झाला आणि या विश्वातील दैन्य हरण करण्याची जिद्द निर्माण झाली. जगण्यातले सारे श्रेयस आणि प्रेयस ज्या स्वरांच्या मदतीने हृदयाशी घट्ट कवटाळता यावे, असा हा लावण्यमयी स्वर. प्रत्येक गाण्याचे असे अतीव सुंदर लेणे घडवणाऱ्या आशा भोसले यांना जाहीर झालेल्या महाराष्ट्र भूषण या सन्मानाने महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या मनात तो आपलाच सत्कार आहे, अशी भावना निर्माण झाली आहे. 'लोकसत्ता'च्या वतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

# गोदामाचे शटर उचकटून 22 लाखांचा मुद्देमाल चोरला, पोलिसांनी तिघांच्या मुसक्या आवळल्या



नांदेड: नांदेडच्या एमआयडीसी परिक्षेत्रातील 'डिजॉन' रेडिमेड कपड्यांच्या गोदामाचे शटर वाकवून गोदामातील सूट, शेरवानी, ब्लेजर व हेवी जीन्स आदी सुमारे २२ लाख रुपयांचा माल चोरून नेणाऱ्या तीन चोरट्यांना नांदेड ग्रामीण ठाण्यातील गुन्हे शोध पथकाने अटक केली. याशिवाय, नांदेड ग्रामीण पोलिसांनी २४ मार्च रोजी मध्यरात्री उशिरा ताब्यात घेतलेल्या आरोपी चोरट्यांकडून १८ लाख रूपयांच्या मुद्देमालासह सदर गुन्ह्यात वापरलेले वाहनही जप्त केले असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

नांदेडच्या एमआयडीसी परिक्षेत्रामधील 'डिजॉन' कॅज्युअल्सचे मालक, व्यवस्थापक, कर्मचारी तसेच नोकर नेहमीप्रमाणेच १६ मार्च रोजी सायंकाळी उशिरा रेडिमेड कपड्यांचे गोदाम व रेडिमेड कपड्याचे दुकान बंद करून घरी गेले. १७ मार्च रोजी पहाटे सव्वातीन ते सव्वाचार वाजेदरम्यान चेहऱ्यावर कापड बांधून आलेल्या अज्ञात चोरट्यांनी गोदामाच्या पाठीमागील शटर वाकवून आत प्रवेश केला.

त्याचवेळी, अज्ञात चोरट्यांनी गोदामात तब्बल एक तासभर थांबून गोदामातील सुट, शेरवानी, ब्लेजर, हेवी जिन्स व लहान मुलांचे रेडिमेड ड्रेस, दोन संगणक आणि काउंटरमधील रोख ५०० रुपयांसह सुमारे २१ ते २२ लाख रूपये किंमतीचे रेडिमेड ड्रेस चोरून नेले, अशी माहिती 'डीजॉन' कॅज्युअल्सचे मालक दीपक प्रेमचंदानी व व्यवस्थापक खान इरफान अली यांनी दिली.

या घटनेची माहिती समजताच डीवायएसपी डॉ. सिध्देश्वर भोरे, प्रभारी पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड, गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शेख असद, गणेश होळकर व त्यांचे अन्य सहकारी पोलीस कर्मचारी हे घटनास्थळी गेले.

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या मार्गदर्शनानुसार, अपर पोलीस अधीक्षक निलेश मोरे यांनी १८ मार्च रोजी दुपारी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर या प्रकरणात पोलिसांनी कारवाई करून तिघांना अटक केली.

# नांदेड जिल्ह्यात करोना मृतांच्या अंत्यविधीसाठी 12 तासांचे वेटिंग



नांदेड जिल्ह्यात करोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. शासकीय आणि खासगी रुग्णालयात या रुग्णांवर उपचार केले जात आहेत. मात्र मागील काही दिवसात करोना रुग्णांच्या मृत्युचे प्रमाण वाढल्यामुळे नांदेडकरांची चिंता वाढली आहे. वाढत्या मृत्यूंमुळे मृतांच्या नातलगांना अंत्यसंस्कारासाठी बारा-बारा तास वाट पाहावी लागत आहे.

करोना आजारामुळे आता मृत्यूची संख्या वाढत आहे. नांदेड जिल्ह्यात मागील तीन दिवसात ९ जणांचा मृत्यू झाला. शहरातील मृत रुग्णांचा गोवर्धन घाट स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला. गोवर्धन घाट स्मशानभूमीत

अंत्यसंस्कारासाठी रांग लागली होती. अक्षरशः स्मशानभूमीच्या गेटपासून सरण रचून अंत्यसंस्कार करण्याची वेळ प्रशासनावर आली.

वाढती रुग्णसंख्या रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. त्यावर उपाय म्हणून प्रशासनाने टाळेबंदी घोषित केली आहे. २४ मार्च पासून ४ एप्रिल पर्यंत ही टाळेबंदी असणार आहे.

या काळात सर्वसामान्य नागरिकांनी विनाकारण बाहेर फिरू नये, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

नांदेड जिल्ह्यात करोना रुग्णांची संख्या आतापर्यंत ३५ हजाराच्या पुढे गेली आहे तर आतापर्यंत ६८३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे नांदेडमध्ये करोनाची दहशत आहे. गोवर्धन घाट स्मशानभूमीत लोखंडी स्टँडची संख्या कमी आहे, त्यातच अचानक मृतांची संख्या वाढल्याने प्रशासनाची तारांबळ उडत आहे. स्मशानभूमीच्या आवारात लाकडे रचून करोनामुळे मृत्यू झालेल्या रुग्णांवर अंत्यसंस्कार करावे लागले आहेत. करोनामुळे मृत्यू झाल्यास मृत्यू प्रमाणपत्र आणि पोलिसांची एनओसी आल्यानंतर मृतदेहावर अंत्यसंस्कार केले जात आहेत. महापालिकेच्या

कर्मचाऱ्यांकडून सर्व खबरदारी घेऊन अंत्यसंस्कार केले जात आहेत. करोनामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या वाढत असल्याने यंत्रणेवर ताण येत आहे.

# परमबीर यांची चौकशी होऊ नये ही भूमिका आहे का?



मुंबई : परमबीर सिंह पोलीस आयुक्त असताना त्यांच्या कार्यालयातून मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यालयाचा 'डीव्हीआर' गायब झाला असून राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) याची चौकशी का करीत नाही,असे सवाल प्रदेश कॉंग्रेस सरचिटणीस व प्रवक्ते सचिन सावंत यांनी केले आहेत. हे डीव्हीआर गायब करण्यामागे परमबीर सिंह यांचा हात आहे का, याची चौकशी एनआयएने करावी आणि एनआयए करीत नसेल तर राज्य सरकारने ती करावी, अशी मागणी सावंत यांनी केली आहे.

यासंदर्भात पत्रकारांशी बोलताना सावंत म्हणाले की, १० मार्च २०२१ रोजी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय परिसराचा डीव्हीआर एटीएसने अधिकृतरीत्या ताब्यात घेतला. परंतु दोनच तासांमध्ये हा डीव्हीआर एटीएसला देऊन चूक झाली असे लक्षात आल्याने एटीएसचे प्रमुख जयजितसिंह यांना परमबीर सिंह यांच्या कार्यालयातून दूरध्वनी गेला. तो हा कोणी केला हे स्पष्ट आहे व चौकशीअंती समोर येईल. परंतु डीव्हीआरमध्ये स्पष्ट दिसत नाही, असे कारण देऊन तो नंतर तपासून परत देऊ असे सांगून परमबीर सिंह यांच्या कार्यालयामधून अधिकाऱ्याला पाठवून तो ताब्यात घेण्यात आला होता.

त्यानंतर हा डीव्हीआर गायब झाला आहे.

या डीव्हीआरमध्ये स्कॉर्पिओ, इनोव्हा गाड्यांची ये-जा, सचिन वाझे व अन्य अधिकारी कोणाच्या संपर्कात होते, हे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे महत्त्वाचा पुरावा गायब केला गेला तरी गेले १८ दिवस एनआयएने सचिन वाझेच्या कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याला जबाबासाठी बोलावले नाही, हे आश्चर्यकारक आहे असे सावंत यांनी सांगितले.

# व्यापाऱ्यांचा बंदविरोधात संताप



कल्याण : वाढत्या करोना रुग्णसंख्येला आळा घालण्यासाठी पालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहरात शनिवार आणि रविवारी अत्यावश्यक सेवेतील दुकाने वगळता इतर दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देताच या निर्णयाचा व्यापाऱ्यांनी जोरदार निषेध केला आहे. शनिवारी व्यापारीवर्ग, दुकानदार आणि ज्वेलर्स असोसिएशनने 'पालिका आयुक्त हटाव, दुकाने बचाव' अशी जोरदार घोषणाबाजी करत पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयावर मोर्चा काढला. मात्र, पालिकेच्या समोरील रस्त्यावरच या व्यापाऱ्यांना रोखण्यात आल्याने व्यापाऱ्यांनी रस्ता बंद आंदोलन करत रस्त्यावरच ठिय्या दिला. जोपर्यंत पालिका आपला निर्णय मागे घेत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा व्यापाऱ्यांनी घेतला.

या आंदोलनात कल्याण-डोंबिवली शहरातील सुमारे ४५० ते ५०० व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी व्यापाऱ्यांनी प्रचंड घोषणाबाजी केली. प्रशासनाकडून छोटे व्यापारी आणि मॉल यांना परवानग्या देताना दुजाभाव केला जात असल्याचा आरोप व्यापाऱ्यांकडून करण्यात आला. आंदोलनाची माहिती मिळताच आमदार रवींद्र चव्हाण यांनी व्यापाऱ्यांची भेट घेत आंदोलनाला पाठिंबा दिला आणि व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाला घेऊन पालिका अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

वाढत्या करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी आयुक्तांनी शहरातील दुकाने रात्री आठपर्यंत चालू ठेवण्याचे आदेश काढले होते. या आदेशानुसार व्यापाऱ्यांकडून सकाळी दहा ते रात्री आठपर्यंत दुकाने चालू ठेवत पालिका प्रशासनाला सहकार्य केले जात आहे. मात्र, तरीही करोना रुग्णांची संख्या आटोक्यात न येता उलट वेगाने वाढत असल्यामुळे पालिका आयुक्तांनी २७ मार्चपासून प्रत्येक शनिवार-रविवारी अत्यावश्यक सेवेतील दुकाने वगळता इतर दुकाने बंद करण्याच्या निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या विरोधात आक्रमक झालेल्या व्यापाऱ्यांनी सकाळपासून पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयासमोरील रस्त्यावर ठिय्या आंदोलन करत प्रशासनाच्या हुकुमशाही निर्णयाविरोधात संताप व्यक्त केला. एकीकडे लोकल, बसमधील गर्दी वाढत असून त्यावर सरकार कोणतेही निर्बंध लागू करत नसताना व्यापाऱ्यांना वेठीस धरून त्यांना दर शनिवार आणि रविवारी व्यवसाय सक्तीने बंद करण्याचे आदेश दिले जातात. दुसरीकडे दारू विकण्यास परवानगी दिली जाते. सरकार आणि पालिका आयुक्तांच्या दुटप्पी भूमिकेवर आक्षेप घेत या निर्णयाने दुकानदारांवर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे हा आदेश पालिका आयुक्तांनी मागे घ्यावा, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली. जोवर याबाबत निर्णय घेत नाही तोपर्यंत ठिय्या आंदोलन सुरू ठेवणार असल्याचे व्यापारी महामंडळाचे अध्यक्ष दिनेश गोर आणि डोंबिवली ज्वेलर्स असोसिएशनचे सेक्रेटरी दिलीप कोठारी यांनी सांगितले.

आमदार रवींद्र चव्हाण यांनी व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाबरोबर प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांची भेट घेत केलेल्या चर्चेतून कोणताही निष्कर्ष निघू शकला नाही. संध्याकाळी उड्डाणपुलाच्या उद्घाटनासाठी पालकमंत्री येत आहेत. ते आणि पालिका आयुक्त यांच्याबरोबर चर्चा करून यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन चव्हाण यांनी दिले. संध्याकाळी उशिरापर्यंत आंदोलन सुरूच होते.

## बॉम्बे बार असोसिएशनने केली आभासी पध्दतीने न्यायालयीन सुनावणीची मागणी



मुंबई आणि महाराष्ट्रात कोविड - १९ प्रकरणांमध्ये वाढत होत असल्यामुळे बॉम्बे बार असोसिएशनने (बीबीए) बॉम्बे हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश दिपांकर दत्ता यांना पत्र पाठवले आहे. त्यात असोसिएशनने असे म्हटले आहे की, मुंबईतील मुख्य खंडपीठासमोर चालणारी न्यायालयीन सुनावणीची प्रक्रिया आभासी पध्दतीने होऊ शकेल किंवा किमान हायब्रिड म्हणजे शारीरिक आणि आभासी अशा दोन्हाही पध्दतीने होवू शकेल का याबाबत निर्णय घ्यावा.

लॉकडाउनवरील निर्बंध कमी झाल्यानंतर उच्च न्यायालयाने डिसेंबर २०२० च्या पहिल्या आठवड्यापासून जवळपास सर्व प्रकरणांची शारीरिक सुनावणी पुन्हा सुरू केली होती. तोपर्यंत मार्च २०२० मध्ये लॉकडाऊन सुरू झाल्यापासून आभासी सुनावणी घेण्यात आली होती.

शनिवारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन ठक्कर यांच्यामार्फत एक निवेदन करण्यात आले. या निवेदनात "साथीच्या आजाराचे गांभीर्य" लक्षात घेऊन राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार २८ मार्चपासून सुरू होणाऱ्या नाईट कर्फ्यूचा संदर्भ दिला.

सूत्रांनी सांगितले की, १९ मार्च रोजी झालेल्या बैठकीत उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय न्यायाधीशांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या प्रतिनिधी तसेच विविध बार संघटनांनी न्यायालयात किमान दोन आठवडे तरी जास्त गर्दी होवू न देण्याचे ठरविले होते, विशेष म्हणजे जोपर्यंत कोर्ट बोलवत नाही तोपर्यंत फिर्यादींच्या येण्यावरही बंदी घालण्यात यावी असे देखील सुचवले होते.

मुंबईतील मुख्य खंडपीठाच्या न्यायाधीशांना शारीरिक सुनावण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग पध्दतीने सुनावणी घ्यायची आहे की नाही याबाबत निर्णय घेण्यात आला.

## भंडारा दुर्घटनेनंतरही रुग्णालयात अग्निसुरक्षा यंत्रणेचा अभाव



**३०० कोटींची गरज, पैसे देण्यास टाळाटाळ**

मुंबई: भांडुप येथील सनराइज रुग्णालयाला लागलेल्या आगीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील कोविड रुग्णालयांचे अग्निपरीक्षण तपासण्याचे आदेश दिले आहेत. दोन महिन्यांपूर्वी भंडारा जिल्हा रुग्णालयाला लागलेल्या आगीत दहा नवजात शिशूंचा होरपळून मृत्यू झाला तेव्हाही मुख्यमंत्र्यांनी तात्काळ अग्निपरीक्षा व अग्निसुरक्षा व्यवस्था लागू करण्याचे आदेश दिले होते. आरोग्य विभागाने अग्निपरीक्षण केलेल्या एकाही रुग्णालयात अग्निसुरक्षा व्यवस्था बसविण्यात आली नसल्याची बाब उघड झाली आहे.

अग्निपरीक्षण व यंत्रणा बसविण्यासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांची आवश्यकता असून आरोग्य विभागाने यासाठी जिल्हाधिकारी तसेच आमदार- खासदारांकडे पाठपुरावा चालवला आहे. आरोग्य विभागाच्या भंडारा येथील जिल्हा रुग्णालयातील शिशू विभागात ९ जानेवारी रोजी लागलेल्या आगीत १० नवजात अर्भकांचा होरपळून मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आरोग्य विभागाच्या सर्व रुग्णालयांचे अग्निपरीक्षण करून तात्काळ अग्निसुरक्षा व्यवस्था बसविण्याचे आदेश दिले होते. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार आरोग्य विभागाने महापालिका तसेच खासगी अग्निपरीक्षण करणाऱ्या यंत्रणांच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्या एकूण ५१२ रुग्णालयांपैकी ४२५ रुग्णालयांचे अग्निपरीक्षण करून घेतले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला अग्निसुरक्षेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करायलाही सांगितले. आरोग्य विभागाने यासाठी एकूण ३३७ रुग्णालयांचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी प्रस्ताव पाठवल्याचे आरोग्य विभागाच्या एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. या ३३७ रुग्णालयांपैकी १५६ रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेच्या कामासाठीचे ४३ कोटी रुपयांचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केले असले तरी प्रत्यक्षात एकाही रुग्णालयातील अग्निसुरक्षेचे काम सुरू झाले नसल्याचे आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले. भंडारा जिल्हा रुग्णालय तसेच काही रुग्णालयांच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. आरोग्य विभागाच्या वाट्याला अर्थसंकल्पाच्या अवघा एक टक्के रक्कम येते. हा मंजूर निधीही वित्त विभागाकडून वेळेवर दिला जात नाही. भंडारा जिल्हा रुग्णालयाला लागलेल्या आगीनंतरही अग्निरोधन यंत्रणा उभारण्यासाठी ठोक निधी देण्यात आलेला नाही.

# भाड्याने दिलेल्या कार विकणाऱ्यांना अटक



नवी मुंबई, गरजवंताकडून त्यांची वाहने भाड्याने देण्याच्या बहाण्याने घेऊन या वाहनांची बनावट कागदपत्रे तयार करून त्यांची परस्पर विक्री करणाऱ्या टोळीतील दोघांना पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. सुरज नारायण पाटील (३४) व जगदीश ऊर्फ करण चुन्नीलाल चौधरी (३३) अशी दोघांची नावे असून या दोघांनी राज्यातील विविध भागांत विकलेल्या ४१ लाख ६८ हजार रुपये किंमतीच्या १० कार हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. या टोळीने अनेक कारची अशाच पद्धतीने विक्री केली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार या टोळीतील सदस्यांची कसून चौकशी करण्यात येत असल्याची माहिती परिमंडळ-२चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

ज्या लोकांच्या गाड्या भाड्याने द्यायच्या आहेत, अशा गरजू लोकांना हे आरोपी हेरत. अस्तित्वात नसलेल्या विक्री सिस्टीम या कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणावर भाड्याच्या वाहनांची आवश्यकता असल्याचे ते सांगत होते. त्यानंतर संबंधित गाडीमालकांची वाहने कागदपत्रांसह ताब्यात घेऊन त्यांना नोटरी केलेला करारनामा देवून त्यांचा विश्वास ते संपादन करत होते. त्यानंतर सुरुवातीचे एक-दोन महिने गाडीचे भाडे देऊन नंतर आपले मोबाइलचे नंबर बदलून आवश्यकतेप्रमाणे कागदपत्रामध्ये फेरफार व बनावट कागदपत्रे तयार करून ही वाहने राज्यातील विविध ठिकाणी ते ३ ते ४ लाखांत विकून मूळ मालकांची फसवणूक करत होते.

या टोळीने पनवेलच्या डेरवली येथील गॅरेजमालक राजशेखर चिक्केगौडा याच्या मध्यस्थीने पनवेल भागांतील ७ कारमालकांची वाहने भाड्याने देण्यासाठी घेतली होती. नंतर या टोळीने या कारच्या भाड्याची रक्कम अथवा त्यांच्या गाड्या त्यांना परत न करता पलायन केले होते. त्यामुळे फसवणूक झालेल्या कारमालकांनी पनवेल तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणाचा तपास स्वतंत्र पथकाच्या माध्यमातून सुरू असतानाच चिक्केगौडा याने आत्महत्या केली. त्यामुळे कारचा अपहार करणाऱ्या टोळीचा ठावठिकाणा शोधण्यात पोलिसांना अडचणी निर्माण झाल्या.

मात्र त्यानंतरदेखील वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र दौंडकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय खेडकर, पोलिस उपनिरीक्षक आकाश पवार, पोलिस हवालदार अमोल कांबळे, अमृत शिंदे, संतोष शिंदे, पोलिस कॉन्स्टेबल राजकुमार सोनकांबळे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या माध्यमातून या टोळीतील आरोपींची माहिती मिळवून सुरज पाटील याला पुण्यातुन तर जगदीश चौधरी याला कोपरखैरणे येथून ताब्यात घेतले.

पोलिसांनी या दोघांची अधिक चौकशी केली असता त्यांनी ही वाहने सहकाऱ्यांच्या मदतीने बनावट कागदपत्रे तयार करून विविध ठिकाणी विकल्याची कबुली दिली.

## ड्रग पेडलर शादाब बटाटा NCB च्या जाळ्यात अडकला!



अभिनेता सुशांत सिंह राजपूत प्रकरणापासून सुरू झालेलं Bollywood Drugs Connection अद्याप थांबण्याचं नाव घेत नाहीये. NCB अर्थात अंमली पदार्थ विरोधी पथकाने गुरुवारी रात्री केलेल्या धडक कारवाईत मुंबईतील परदेशी ड्रग्जचा सर्वात मोठा सप्लायर फारूक बटाटाचा मुलगा शादाब बटाटा एनसीबीच्या हाती लागला आहे. त्याच्याकडून एनसीबीनं तब्बल २ कोटी रुपयांचं ड्रग्ज हस्तगत केलं आहे. शादाब बटाटा हा गेल्या कित्येक वर्षांपासून मुंबई आणि देशभरातल्या ड्रग्जच्या व्यवसायाशी संबंधित होता. तसेच, बॉलिवुडमधल्या अनेक सेलिब्रिटींना Shadab Batata ड्रग्ज पुरवत होता, असं देखील समोर आलं आहे. या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा बॉलिवुडमधले ड्रग्ज कनेक्शन समोर येण्याची शक्यता आहे.

**ड्रग्जचं बॉलिवुड कनेक्शन**

आत्तापर्यंत सुशांत सिंह राजपूत प्रकरणापासून बॉलिवुडमधल्या अनेक सेलिब्रिटींची नावं ड्रग्ज प्रकरणात समोर आली आहे. यामध्ये अभिनेता अर्जुन रामपालचं देखील नाव समाविष्ट आहे. या प्रकरणाचे धागेदोरे अनेक सेलिब्रिटींच्या दारापर्यंत पोहोचायला लागल्यापासून एनसीबीनं अधिक खोलात तपास सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून एनसीबीनं गुरुवारी रात्री उशिरा केलेल्या कारवाईमध्ये फारूकचा मुलगा शादाब एनसीबीच्या जाळ्यात अडकला आहे.

**लोखंडवाला, वर्सोवा, मीरा रोडमध्ये छापे**

एनसीबीनं दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री लोखंडवाला, वर्सोवा आणि मीरा रोड या भागांमध्ये मारलेल्या छाप्यांमध्ये २ कोटी रुपये किंमतीचं MDMA ड्रग्ज सापडलं आहे. त्यासोबतच, काही महागड्या कार देखील हस्तगत केल्या आहेत. याशिवाय छाप्यामध्ये एक नोटा मोजण्याचं मशिन देखील NCB ला सापडलं आहे. MDMA सोबतच फारूख बटाटा एलएसडी, गांजा, बड आणि कोकेनसारखं ड्रग्ज देखील पुरवायचा अशी माहिती एनसीबीला मिळाली आहे. गुरुवारी दिवसभर एनसीबीकडून या प्रकरणात कारवाई केली जात होती. यामध्ये दाऊद इब्राहिमचा हस्तक चिंकू पठाण याच्या डोंगरी आणि नागपाडा भागातल्या ठिकाणांवर एनसीबीनं छापे मारले.

**गोव्यातून 'महाराज' अटकेत**

याआधी ७ मार्च रोजी एनसीबीनं गोव्यामध्ये छापा टाकला होता. झी न्यूजनं दिलेल्या वृत्तानुसार, या छाप्यामध्ये एनसीबीनं हेमंत साह उर्फ महाराजला अटक केली होती. सुशांत सिंह राजपूत ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी अनुज केसवानी आणि रीगल महाकाल यांच्याकडून महाराजबद्दल माहिती मिळाली होती.

## 'एनआयए'चं मिठी नदी पात्रात सर्च ऑपरेशन; लॅपटॉप, सीपीयू, प्रिंटर, नंबर प्लेट्स मिळाल्या



मनसुख हिरेन मृत्यू प्रकरणी तपास करत असलेल्या एनआयएने आज (रविवार) बीकेसी परिसरात मिठी नदीपात्रात शोध मोहीम राबवली. यावेळी नदी पात्रातून एक कॉम्प्यूटर, सीपीयू, दोन नंबर प्लेट्स आणि आणि अन्य साहित्य मिळालं. यामुळे एनआयएच्या हाती आता या प्रकरणाशी निगडीत मोठे धागेदोरे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, एनआयएने या प्रकरणी सचिन वाझेंना अटक केली असून, दुसऱ्यांदा न्यायालयाने एनआयएकडे ताबा दिलेला आहे.

आज दुपारच्या सुमारास एनआयएची टीम सचिन वाझेंना घेऊन मिठी नदीपात्रात शोध मोहिमेसाठी पोहचली होती. यानंतर काही जण नदी पात्रात उतरले व मेटल डिटेक्टरच्या सहाय्याने लॅपटॉप, सीपीयू, डीव्हीआर मशीन, प्रिंटर आणि दोन नंबर प्लेट्स शोधून काढल्या.

या अगदोर एनआयएची टीम सचिन वाझेंना घेऊन वांद्रे परिसरातील खाडीजवळ तपासासाठी आली होती. यावेळी एनआयएचे एसपी विक्रम खलोट हे देखील उपस्थित होते.

मनसुख हिरेन मृत्यू प्रकरणी मुंबई पोलीस दलातील दोन पोलीस निरीक्षक आणि एक वरिष्ठ पोलीस अधिकारी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) रडारवर असून लवकरच त्यांना चौकशीसाठी समन्स बजावला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान अटकेत असणारे निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी एनआयला मनसुख हिरेन यांचा मृतेदह सापडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी (६ मार्च) आपल्याकडील पाच मोबाइल नष्ट केल्याची माहिती दिली आहे.

## अंबरनाथ • सफाईसाठी टाकीत उतरलेल्या तीन कामगारांचा गुदमरुन मृत्यू



अंबरनाथमध्ये असलेल्या एका रासायनिक कंपनीच्या भूमिगत टाकीत सफाईसाठी उतरलेल्या तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. टाकीतील गॅसमुळे तिन्ही कामगारांचा गुदमरुन मृत्यू झाला असून, अंबरनाथ पश्चिमेला असलेल्या आयटीआयजवळील इंडस्ट्रीयल ईस्टर केमिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.रासायनिक कंपनीच्या भूमिगत टाकीची सफाई करण्यासाठी तीन कामगार उतरले होते. सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास कामगार सफाईसाठी उतरले.

यात एकाची तब्येत बिघडल्यामुळे तो औषध आणण्यासाठी दवाखान्यात गेला होता. याच काळात तीन कामगार टाकीत बेशुद्ध पडल्याची माहिती समोर आली. टाकीत असलेल्या गॅसमुळे त्यांचा गुदमरुन मृत्यू झाला. हर्षद, बिंदेश आणि दिनेश अशी मृत कामगारांची नावं आहेत.

तिघेही उत्तर प्रदेशचे रहिवासी होते. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे तीन कामगारांचा बळी गेल्याचा आरोप आता केला जात आहे. कलरच्या कामासाठी बोलावून तिन्ही कामगारांना रसायनच्या भूमिगत टाक्या साफ करायला उतरवल्याचा आरोप केला जात आहे. महत्त्वाचं म्हणजे कामगारांना नाका-तोंडाला बांधण्यासाठी विशेष मास्क दिले नव्हते. कामगारांनी कपडाच बांधलेला होता, असं घटनास्थळी असलेल्यांनी सांगितलं.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898